**ARTHA**
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg No. PNC-116. Licence No. 34

वर्ष ४० | पुणे, बुधवार, १८ डिसेंबर, १९७४ | अंक २४

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड







स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, व्हॉन्स, वॉयल्स, केम्ब्रिक्स – कुठेही गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड व धुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
कापड • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. १
१८, अपोलो स्ट्रीट, मुंबई-१.


FOR HIRE
FARE
वाजवी भाड्यासंबंधी न्याय !
फक्त
डायमंड
मिटर्सच
देऊ शकतात
दीर्घकाल टिकाऊ
मजबूत बांधणी,
१०० टक्के स्वदेशी
माफक किंमत
एक वर्षाची गॅरंटी
बिनचूक भाडे दर्शविणारे
विक्रीनंतरची सेवा उपलब्ध
उत्पादक
डायमंड क्लॉक मॅन्युफॅक्चरींग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड
११८० बुधवार पेठ, पुणे-२
सोल सेलिंग अेजंट्स: आनंद ट्रेडर्स ११८० बुधवार पेठ, पुणे-२ फोन: ५६१७९


प्रभूचे हजार हात
भगवान श्रीकृष्णाने आपल्या करंगळीवर गोवर्धन पर्वत तोलून गोकुळाचे संरक्षण केले.
भारतातील बचतदारांचे हजारो हात आज लक्षावधी देशबांधवांचे रक्षण करीत आहेत आणि स्वतःची आणि समाजाची उन्नतीही साधत आहेत.
आपली बँक... बँक ऑफ महाराष्ट्र आपल्या बचतदारांना प्रभूचे हजार हात मानते आणि आपल्या भारतभर पसरलेल्या २५० हून अधिक शाखांतून त्यांची सेवा करून कर्तव्यपूर्तीचे समाधान मिळविते.
बँक ऑफ महाराष्ट्र
११७७, बुधवार, बाजीराव रोड,
पुणे-४११००२

## त्याची निवड

रघुनाथराव आपल्या बारा वर्षाच्या पुतण्याला म्हणाले “ चारू, तू शाळेत चांगला अभ्यास केलेला दिसतोस; बक्षीस म्हणून तुला मी एक नवीन बुक विकत घेऊन येणार आहे. तुला कसले पुस्तक पाहिजे ? ” त्यावर चारू म्हणतो : ‘ मला पाहिजे तसले बुक देणार असाल तर पाहा. मला एक सेव्हिंग्ज बुक द्या. ”

* * *

## कल्पक नोकर

बँकर : “ तुम्हाला ह्यापूर्वी कुठेच नोकरी नव्हती ना ? मग बँकेत काम करण्याचा सात वर्षाचा अनुभव आहे असं कसं सांगता ? ह्याचा अर्थ काय ? ”

अर्जदार : “ वा ! तुम्ही दिलेल्या जाहिरातीत कल्पक नोकर पाहिजे असं म्हटलं होतं ना ! ”

* * *

## प्रिय पत्नीची एन्डॉर्समेंट

एक तरुण स्त्री पैसे देणाऱ्या कॅशिअरकडे गेली व त्याला म्हणाली, “ हा चेक मला वटवावयाचा आहे. ”

कॅशिअर : ठीक, पण त्याच्या मागे सही करा. ” त्यावर ती म्हणाली, “ हा चेक माझ्या पतीनेच मला पाठविला आहे. ते आता आपल्या कामावर गेले आहेत. ”


कॅशिअर : हरकत नाही; त्याच्या पाठीवर सही करा. म्हणजे आम्ही तुम्हांला पैसे दिल्याचे त्यांना कळेल. ” थोड्या वेळात तिने चेकच्या पाठीवर “ आपली प्रिय पत्नी, कमला ” अशी सही करून तो आणून दिला !

* * *

## घरी न नेण्याची वस्तू

मुंबईमधील एका बँकेचे तिमाही ऑडिट सुरू होते. तीन तपासनीस काम करीत होते. रात्रीचे ९ वाजले होते. त्या वेळी त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, “ ५,००० रुपये कमी दिसत आहेत. ” बाकीच्या दोघांनी हिशेबाची कसून तपासणी करून चूक असल्याचे नक्की केले. दुसऱ्या दिवशी चूक शोधण्यास सुरुवात झाली. तेव्हा चेक कॅन्सेलेशन खात्याकडे चुकीचा शोध लागला. खात्याचा प्रमुख नव्यानेच कामावर घेतलेल्या तरुण मुलीकडे गेला व म्हणाला “ मिस जोशी, काल तुम्ही ५,००० रुपयांचा एक बेअरर चेक कॅन्सल केल्याचें आठवते काय ? ” त्यावर मिस जोशी पर्स उघडीत म्हणाली, “ तो चेक होय, मीच घरी नेला होता, माझ्या आईला मी काय काम करते ते दाखविण्यासाठी. ”

* * *



☆ अर्थ ☆

बुधवार, १८ डिसेंबर, १९७४



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*" अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

# हितचिंतकांचा व वाचकांचा साभार निरोप

" अर्थ " पत्राचा हा शेवटचा अंक आमच्या हितचिंतकांच्या आणि वाचकांच्या हाती देण्यात आम्हास समाधान वाटत आहे. कारण, " अर्था "ने आपले अंगीकृत कार्य एकनिष्ठेने गेली ४० वर्षे आपल्या कुवतीप्रमाणे केले आहे अशी आमची मनोदेवता आम्हास सांगत आहे. " अर्था"च्या हितचिंतकांचे आणि त्या हितचिंतनाचे प्रत्यक्ष सहायात रूपांतर करणाऱ्या आमच्या उपकारकर्त्यांचे स्मरण येथे कृतज्ञतापूर्वक होणे स्वाभाविक आहे. ' अर्था'चे प्रकाशन बंद करण्याचा विचार ह्यापूर्वी दोन वेळी आला होता, परंतु त्या वेळी काही हितचिंतकांच्या उत्स्फूर्त सहायामुळे त्या परिस्थितीवर मात करता आली. आजही काही हितचिंतक सहायासाठी खंबीरपणे पुढे आले आहेत, परंतु आजची आमची अडचण आर्थिक नाही, तर ४० वर्षांच्या अखंड कामामुळे आणि वयपरत्वे आलेला एका प्रकारचा शीण ही खरी अडचण आहे आणि ती दूर करणे कुणालाच शक्य नाही.

" अर्था"च्या स्थापनेपासून आजतागायत " अर्था"ला ज्यांचे उत्कृष्ट सहाय झाले, त्यात श्री. ग. र. जोग, बी. ए., एलएल. बी. ह्यांच्या तज्ज्ञ संपादकीय सहायाचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. श्री. द. रा. कुलकर्णी हेही प्रथमपासूनचे ' अर्थ प्रतिनिधी ' म्हणून आमच्या जाहिरातदारांना सुपरिचित आहेत. "अर्था"च्या मुद्रणाबाबत ' आर्यभूषण 'च्या सर्वच मंडळींचे अत्यंत हार्दिक सहकार्य अर्थास लाभले आहे. " अर्था"ची लेखणी खाली ठेवतेवेळी ह्या सर्वांच्या उपकारांच्या जाणीवेचे मनावर एक प्रकारचे दडपण आले आहे. महाराष्ट्राला आर्थिक वाङ्मय पुरविण्यासाठी आम्ही केलेले श्रम दिसतात, त्यामागे ह्या सर्वांचा खंबीर आधार होता, हे येथे मुद्दाम नमूद करणे आवश्यक आहे. ' अर्था 'च्या ४० वर्षांच्या इतिहासात एकही अंक उशिरा निघाला नाही, ही खरोखर देवाची कृपाच म्हटली पाहिजे

" अर्था " च्या वर्गणीदारांच्याबद्दल आमचा अनुभव अत्यंत स्पृहणीय आहे. एकदा जो वर्गणीदार झाला, तो कायमचाच; ' अर्था ' ची वर्गणी कुणी थांबविल्याचे उदाहरण अत्यंत विरळा आहे. वर्गणीचे नूतनीकरण करताना वाचकांनी ' अर्था ' ची केलेली प्रशस्ती आम्हांस कितीतरी वेळा सुखवून गेली आहे. " अर्था " च्या उपयुक्ततेची ही अत्यंत बोलकी पावती आहे. " अर्था " ला मान्यवर अर्थतज्ज्ञांचेही जे अभिप्राय मिळाले त्याइतकीच सामान्य वाचकांची प्रतिक्रिया मोलाची आहे, आर्थिक सहायाप्रमाणेच हे प्रोत्साहन मोलाचे आहे. ह्या सर्वांना साभार निरोप. ह्या सर्वांचे आयुष्य सुखसमाधानाने समृद्ध होवो.

---

## ' आर्यभूषण ' चे आभार

" अर्था "चे मुद्रण पहिल्या अंकापासून ह्या शेवटच्या अंकापर्यंत, गेली ४० वर्षे, आर्यभूषण प्रेसमध्ये होत आले आहे. ' अर्था' स प्रारंभीच्या काळी आर्यभूषणचे तेव्हाचे प्रमुख श्री. अनंत विनायक उर्फ वामनराव पटवर्धन ह्यांनी छपाईच्या बिलात सूट देऊन ( प्रत्येक वर्षाचे शेवटच्या महिन्यातील सर्व अंक मोफत छापून ) मोलाचे साहाय्य केले. आर्यभूषणचे तपोवृद्ध व्यवस्थापक श्री. शासाहेब पटवर्धन ह्यांनी सतत आपुलकीने सहकार्य केले, त्यामुळेच ' अर्थ ' वक्तशीरपणा राखू शकला. प्रेसमधील सर्वच कर्मचाऱ्यांनी आणि कामगारांनी मनापासून ' अर्था 'साठी शक्य ते सर्व केले. मी ह्या सर्वांचा ऋणी आहे. आर्यभूषण प्रेस ह्या वर्षअखेर बंद करणे त्याच्या चालकांना भाग पडत आहे. सामाजिक कर्तव्यबुद्धीने चालविल्या जाणाऱ्या, पुण्यातील एक शतक जुन्या आणि नामवंत अशा ह्या प्रेसची उणीव भरून निघणे अशक्य आहे, ह्याबद्दल सर्व संबंधितांना हळहळ वाटणे स्वाभाविक आहे.

---

एन्. व्ही. वडनेरकर — फोन : १५७८१
जवाहिरे आणि सराफ
स्पर्धांसाठी लागणाऱ्या ट्रॉफीज, पदके, कप्स् आणि ढाली यांचे उत्पादक
४१४ रविवार पेठ, पुणे ४११००२

## वाहतुकीच्या साधनांत गेल्या ८५ वर्षांत झालेला फरक

हिंदुस्थानात रेल्वेजची स्थापना व त्यांच्या रस्त्यांची आखणी ह्यांचा ब्रिटिश व्यापाऱ्याच्या ह्या देशांतील विस्ताराशी निकट संबंध, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. ब्रिटिश तयार मालाचा खप हिंदुस्थानात व्हावा व त्या मालाच्या मोबदला हिंदी लोकांना आपला कच्चा माल देता यावा, ह्यासाठी दळणवळणाच्या साधनांची जरुरी होती. हिंदुस्थानातील प्रजेला, यांत्रिक पद्धतीमुळे स्वस्त व मुबलक तयार होणाऱ्या वस्तू हव्या असतील, तर त्याप्रीत्यर्थ विनिमय म्हणून कच्चा माल परदेशी पाठविता यावा, अशी व्यवस्था होणे क्रमप्राप्तच होते. ब्रिटनचा कापडाचा धंदा आयात कपाशीच्या पुरवठ्यावरच अवलंबून होता आणि हिंदी कपाशीच्या बदला त्याचे तयार कापड देणे आयात-निर्यातीच्या सुलभतेवर अवलंबून राहणे अपरिहार्य होते. कपास पिकविणाऱ्या मुलुखाचा मुंबई बंदराशी लोहमार्गाने संबंध जोडून स्वस्त वाहतुकीची तजवीज करण्यासाठी ८५ वर्षांपूर्वी प्रयत्नास सुरुवात झाली. नवीन सुरू व्हावयाच्या आगगाड्यांच्या योजनेत प्रवाशांच्या वाहतुकीस प्राधान्य नव्हते, कारण हिंदी लोक आगगाडीने प्रवास करणार नाहीत, असा तेव्हा प्रचलित समज होता, म्हणून रेल्वेजच्या उत्पन्नाचा अंदाज करताना फक्त मालाच्या वाहतुकीचेच आकडे धरण्यात आले. समुद्रकिनारा व अंतर्गत मुलूख ह्यांच्यामध्ये आडवा येणारा सह्याद्रि कोठे व कसा ओलांडावा, त्यातून लोहमार्ग कसा आखावा, इत्यादी प्रश्नांस महत्त्व प्राप्त झाले. पुणे शहरास व्यापारीदृष्ट्या महत्त्व नसल्याने केवळ ते पेशव्यांचे राजधानीचे ठिकाण व मोठ्या वस्तीचे गाव, म्हणून तेथून रेल्वे-रस्ता काढणे योग्य नाही, असे मत कित्येकांनी प्रदर्शित केले होते. जास्तीत जास्त माल निर्गत व्यापारास मिळू शकेल अशा जिल्ह्यांशी मुंबई बंदर लोहमार्गाने जोडावे असा मुद्दा ह्या अभिप्रायाच्या मुळाशी होता. तथापि शेवटी आगगाड्या लोकप्रिय झाल्या व त्यांतून उतारूंची ये-जा मोठ्या प्रमाणावर होत आली आहे. इतर मागासलेल्या देशांपेक्षा हिंदी लोक जास्त सुधारणाप्रिय आहेत, असे काही लोकांचे म्हणणे होते ते खरे ठरले व आता तर मोटार लॉऱ्या व बसेस ह्यांनी रेल्वेजनाही मागे टाकण्यास सुरुवात केली आहे. उतारूंबरोबर मालाचीही ने-आण मोटारीतून करणे कित्येक वेळा स्वस्त व सोयिस्कर असते. वाहतुकीच्या साधनांत गेल्या ८५ वर्षांत झालेली सुधारणा आजच्या आगगाड्या व मोटारी ह्यांकडे केवळ नजर टाकल्यास नीट लक्षात येणार नाही. आगगाड्यापूर्वीच्या काळात प्रवास किती खर्चाचा व दगदगीचा होता, ह्याची कल्पना येण्यासाठी, पंचाऐंशी वर्षांपूर्वी गोळा केलेले काही आकडे तपशीलवार येथे देत आहो :—

### जुन्नर ते सातारा

जुन्नरचा एक व्यापारी आपल्या पत्नीसह साताऱ्यास गेला. दिवस: ६; अंतर: ११४ मैल; खर्च खालीलप्रमाणे :—

| | रु. आ. पै |
|---|---|
| पुण्यापर्यंत २ तट्टे | २–८–० |
| पुणे ते सातारा २ तट्टे | ५–०–० |
| पाळण्यातून मुलास नेण्यासाठी २ हमाल | ६–०–० |
| १ आचारी ४ रु. महिना | ०–१२–९ |
| १ नोकर ३ रु. महिना | ०–९–६ |
| जेवणाचा खर्च | ३–०–० |
| किरकोळ | ०–८–० |
| | १८–६–३ |

मैली दोघांस खर्च: २॥ आणे. आज एवढाच प्रवास करण्यास किती कमी खर्च येतो ह्याची कल्पना सर्वांस आहे. शिवाय, वेळ आणि दगदग वाचते, ती निराळीच.

### मुंबई ते जुन्नर

मुंबईचा एक ज्योतिषी मुंबईहून जुन्नरास गेला. त्यास ७ दिवस लागले व खर्च १७ रु. २ आणे ३ पै आला. पुणे मार्गाने १२१ मैल प्रवास झाला, म्हणजे दर मैली २¼ आणे खर्च पडला.

### धारवाड ते पुणे

सरकारी प्राथमिक शाळांचा एक इन्स्पेक्टर धारवाडहून पुण्यास गेला. ह्या २६८ मैलांच्या अंतरास १२ दिवस लागून २५ रु. १२ आ. खर्च आला. दर मैली आकार १½ आणा बसला.

### मुंबई ते पंढरपूर

मुंबईचे चार रहिवासी पंढरपुरास गेले. मुंबई ते पनवेल बोटीने, तेथून पुण्यापर्यंत बैलगाडीतून व त्यानंतर तट्टावर बसून त्यांनी पंढरपूर गाठले. प्रत्येक माणशी दर मैलास १ आणा खर्च आला.

### मुंबई ते इस्लामपूर

खालील माहितीवरून प्रवासांतील अडचणींची कल्पना येईल. मुंबईत नोकरीवर असलेला एक कारकून इस्लामपुराहून पनवेल मार्गाने १८६ मैल मुंबईस गेला, त्याच्या खर्चाचा तपशील :—

त्याचे स्वतःचे तट्टू होते व उम्ब्रजला तो आपल्या

| | रु. आ. पै |
|---|---|
| स्नेह्याकडे उतरला | ०–०–० |
| उम्ब्रज ते सातारा तट्टासाठी खर्च | ०–३–६ |
| स्वतःची शिदोरी साताऱ्याच्या मुक्कामात खाल्ली | ०–०–० |
| कवठे मुक्काम, तट्टासाठी | ०–३–३ |
| खापूरवळः, स्वतः, तट्टू, नोकर व रामोशी | ०–४–३ |
| येथे त्यांस एक मित्र भेटला, त्याने पुण्यापर्यंतचा खर्च केला | ०–०–० |
| पुणे ते वडगाव: तट्टू, स्वतः व रामोशी | ०–२–६ |
| खोपोली ,, ,, | ०–३–६ |
| पनवेल ,, ,, | ०–३–६ |

| | |
|---|---|
| पनवेलहून तट्टास व नोकरास परत पाठविण्याचा खर्च (१६ दिवसांचा नोकराचा पगार: २ रु. २ आ.) | २-१२-० |
| पनवेलहून बोटीचे भाडे | ०-८-० |
| घरी सामान पोचविण्यासाठी हमाली | ०-१-९ |
| दर मैली खर्च ३॥ पै. | ४-१०-६ |

वर दिलेल्या उदाहरणांवरून ८ वर्षापूर्वीच्या प्रवासाची परिस्थिती काय होती याची कल्पना येईल. त्या वेळी येणाऱ्या खर्चाची आता लागणाऱ्या खर्चाशी तुलना केली, तर ती बोधप्रद होईल. आज जी. आय. पी. रेल्वेवर तिसऱ्या वर्गाने प्रवास करणारांस पहिल्या ५० मैलापर्यंत दर मैली ४ पै व नंतर ३ पै खर्च येतो. मेलगाडीस आकार थोडा जास्त बसतो. ह्या खर्चातच लहानसे एखाद दुसरे बोजके नेता येते, ते वेगळेच. सोयी, वेळात व खर्चात बचत, निर्धास्तपणा इत्यादी गोष्टी आता सहज प्राप्त होऊ शकतात. गेल्या ८५ वर्षातला हा फरक विलक्षण नव्हे काय? विद्युतशक्तीचा उपयोग येथील आगगाड्या चालविण्याकडे करता येणे शक्य आहे, ह्याची जाणीव तेव्हा होती, तिचे आता रूपांतर प्रत्यक्ष व्यवहारात झाले आहे. आज हिंदुस्थानातील एकूण लोहमार्गाची लांबी ४२,९५० आहे.

अर्थ २७-९-३५

---

## हिंदी सोन्याच्या निर्गतीचे सरकारी समर्थन

गेली साडेतीन वर्षे हिंदुस्थानातून सोन्याची सारखी निर्गत होत आहे तिच्या संबंधाचे सामान्य हिंदी लोकमत आणि सरकारची त्या विषयाकडे पाहण्याची दृष्टी ह्यामध्ये एकवाक्यता नाही. सर्वसाधारण जनतेच्या सुवर्णनिर्गतीबाबतच्या विचारात अज्ञान व पूर्वग्रह ह्यांचा काही भाग आहे असे क्षणभर गृहीत धरले तरी सर जेम्स ग्रिग ह्यांनी आपले बजेट लेजिस्लेटिव्ह असेंब्लीपुढे मांडताना केलेल्या भाषणात ज्या तऱ्हेने त्यांची वासलात केली ती चर्चेची पद्धती समर्थनीय आहे असे म्हणता यावयाचे नाही. वस्तुतः माजी फडणवीस, सर जॉर्ज शूस्टर, ह्यांच्याच मुद्द्यांची त्यांनी संक्षेपाने री ओढली आहे. त्यांचा एकच मुद्दा येथे घेऊ. कपाशीसारख्या हिंदी मालास तेजी येऊन त्याची विशेष किफायतशीर रीतीने परदेशी निर्गत झाली तर शेतकऱ्यास आणि व्यापाऱ्यास आनंद होईल हें उघड आहे. त्याचप्रमाणे, हिंदुस्थानातून चढीच्या भावाने व लोकांस फायदा मिळून सोन्याची परराष्ट्रांत निर्गत झाली तर ती खरोखर इष्टापत्ती असता तिच्याविरुद्ध निषेध का व्हावा ह्याचे आमच्या फडणवीसांस आश्चर्य वाटत आहे. हिंदुस्थानातून बाहेर जाणारे सोने येथील खाणीतून निघत असून त्या धंद्यात अनेक लोकांस काम व फायदा मिळत आहे अशी सर जेम्स ह्यांची कल्पना असणे शक्य नाही. निर्गत होणारे सोने कोणत्या वर्गामधून येत आहे, ते कोणत्या परिस्थितीत विकले जात आहे, स्वस्त असता विकत घ्यावे आणि महागले म्हणजे विकावे ह्या हिशेबी तत्त्वास अनुसरून किती लोकांनी आपल्या डागडागिन्यांतले सोने काढून टाकले आहे, अडचणीत सापडल्यामुळे किती लोकांस नाइलाजाने गाठच्या सोन्यास, चढीच्या भावाने का होईना, मुकावे लागले आहे इत्यादी तपशीलवार माहिती हिंदुस्थान सरकारने काळजीपूर्वक चौकशी करून काढली असल्यास ती अवश्य प्रसिद्ध व्हावी, म्हणजे ह्या प्रश्नावर सत्याचा प्रकाश तरी पडेल. अशी महत्त्वाची माहिती सरकारने गोळा केली नसेल तर भांडवलाच्या तारणाचे एक साधन ह्या स्वरूपात लोकांच्या गाठी असलेल्या सोन्याची तुलना शेतीचा माल किंवा कारखान्यात तयार होणारे पक्के पदार्थ ह्यांच्याशी करून जनतेच्या मतास हास्यास्पद ठरविण्याचा प्रयत्न हिंदुस्थान सरकारच्या फडणवीसांनी करावयास नको होता. त्यांच्याच विचारसरणीचा अवलंब करून असे म्हणता येईल की मंदीमुळे हिंदी कारखाने चालेनासे झाले, पण दुसऱ्या देशांत औद्योगिक चलती असली तर आमच्या धंदेवाल्यांनी आपली यंत्रसामग्री फायद्याने विकावी आणि परराष्ट्रात तिची निर्गत करून आनंद मानावा आणि ह्या भाग्योदयाबद्दल स्वतःचे अभिनंदन करावे. ह्या दाखल्यात थोडीफार अतिशयोक्ती असली तरी सोन्याच्या निर्गतीचे ज्या मुद्द्यांवर समर्थन केले जाते त्यांच्या सदोषतेचे आविष्करण त्याने होण्यासारखे आहे. ह्या विषयाची चर्चा असेंब्लीत होईल तेव्हा सर जेम्स ग्रिग आपले म्हणणे अधिक विस्ताराने व मुद्देसूद रीतीने पुढे मांडतील अशी अपेक्षा आहे.

अर्थ ६-३-३५

## अमेरिकेतील मोटारींचे उत्पादन घटले

खनिज तेलाच्या टंचाईमुळे व महागाईमुळे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला आहे. मोटारी तयार करणाऱ्या तेथील कारखान्यांना दीर्घकालीन मंदीला तोंड द्यावे लागत आहे. जनरल मोटर्स, क्रिसलर आणि फोर्ड ह्यांसारख्या बड्या मोटारकंपन्या आपले उत्पादन कमी करीत आहेत आणि भांडवल गुंतवणुकीच्या कार्यक्रमात काटछाट करीत आहेत. गेल्या वर्षाशी तुलना करता चालू वर्षात मोटारगाड्यांचे उत्पादन २४ टक्क्यांनी कमी झाले आहे. बाजारपेठेत तयार असणाऱ्या मोटारींची मागणीही कमी झाली आहे. निदान २१ टक्के तरी मागणी कमी झाली असावी, असा अंदाज आहे. त्यामुळे ह्या बड्या कंपन्यांनी आपल्या कामगारांना कमी करण्यास प्रारंभ केला आहे. मोटारधंद्यातील मंदीचा परिणाम पोलाद-कारखान्यांवर होण्याची शक्यता आहे.

---

**कृत्रिम गर्भधारणा घटस्फोटास कारण**—कोलंबियामधील पार्लमेंटास तेथील सरकारने सादर केलेल्या एका विधेयकात पत्नीने घडवून आणलेली कृत्रिम गर्भधारणा हे घटस्फोटास पुरेसे कारण असल्याचे ठरविण्यात आले आहे. पतीच्या संमतीने किंवा त्याच्याच रेताने ही गर्भधारणा निर्माण घडविली असेल तर मात्र त्यामुळे पत्नीस घटस्फोट मिळणार नाही. कोलंबिया हा दक्षिण अमेरिकेतील कॅथॉलिक ख्रिस्ती बहुसंख्यांचा देश आहे आणि सध्या तेथे घटस्फोटाला कायदेशीर मान्यता नाही.

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड

म्हणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझिया पाऊली ।
या कारणे मी साऊली । न संडी तुझी ॥ —श्री ज्ञानेश्वरी

रजिस्टर्ड अँण्ड हेड ऑफिस : ९८० सदाशिव पेठ, पुणे २०

फॅक्टरी : श्रीपूर, व्हाया अकलूज, जि. सोलापूर

## शुभ्र दाणेदार साखरेचे
## आणि रेक्टिफाईड व डिनेचर्ड स्पिरिटचे आणि
## उच्च प्रतीच्या देशी व विदेशी (IMFL) मद्याचे उत्पादक


बृहन्महाराष्ट्रातील मध्यमवर्गाने गुंतविलेल्या भांडवलावर यशस्वी
रीतीने चालू असलेला हा साखर व स्पिरिटचा कारखाना
मध्यमवर्गीयांचे भूषण होय !

फोन : ५७८११-१२-१३
तार : श्री–पुणे

ज. चं. आगाशे
प्रा. चं. आगाशे
जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर्स

# बेनाडीकर

देशाच्या औद्योगीकरणाला गती मिळाल्यावर निरनिराळ्या क्षेत्रांतली माणसे कारखानदारीच्या क्षेत्रात येऊ लागली. श्री. वसंतराव बेनाडीकर हे खरे शिक्षण क्षेत्रांतले, बी. ए., बी. टी. झालेले, सांगली एज्युकेशन सोसायटीचे एक तज्ज्ञ शिक्षक. किर्लोस्करवाडीत त्या संस्थेच्या हायस्कुलात ते काम करीत असता त्यांनी शाळा सोडून किर्लोस्कर कारखान्यात प्रवेश केला. (१९४३)



प्रारंभी त्यांनी किर्लोस्कर कारखान्याच्या टेक्निकल लायब्ररीची चांगली संघटना केली, व ती करीत असताना कारखान्यातील एंजिनियरांशी स्नेहसंबंध जोडून, कारखान्यातील कामे प्रत्यक्ष पाहून आणि यांत्रिक व तांत्रिक विषयांवरची नियतकालिके व ग्रंथ नजरेखाली घालून त्यांनी आपले व्यावसायिक ज्ञान संपादन केले. इतकेच नव्हे तर कारखान्यातील सामान्य कामगारांनाही आवश्यक असे तंत्रज्ञान मिळावे या हेतूने त्यांनी 'यंत्रबोध' या नावाचे मराठी मासिकही चालू केले. श्री. शंतनुराव किर्लोस्कर व वर्क्स मॅनेजर एन. के. जोशी यांनी बेनाडीकरांच्या या उपक्रमाला प्रोत्साहन दिले.

दोन-तीन वर्षे टेक्निकल लायब्ररीचे व 'यंत्रबोध' मासिकाचे काम केल्यावर श्री. बेनाडीकर हे कारखान्याच्या विक्री विभागाकडे आले. ठिकठिकाणच्या एजंटांना भेटून त्यांच्या व ग्राहकांच्या गरजा व अडचणी समजावून घेऊन त्यांना सत्वर माल पुरवणे व योग्य त्या सोयी-सवलती उपलब्ध करून देणे या गोष्टींकडे त्यांनी मनापासून लक्ष पुरवले. गोड बोलणे, खेळीमेळीने वागणे, आपुलकी व विश्वास निर्माण करणे, हे विक्रयकलेतील मर्म बेनाडीकरांनी सहजगत्या संपादन केल्यामुळे कारखान्याचे चांगले सेल्समन म्हणून त्यांना प्रसिद्धी मिळाली. सेल्स मॅनेजर श्री. आर. व्ही. देशपांडे यांचे मार्गदर्शन श्री. बेनाडीकरांना विशेष उपयुक्त ठरले.

१९५४ साली ते किर्लोस्कर कारखाना सोडून पुण्यास स्वस्तिक रबरकडे आले. त्या कंपनीचे एक संस्थापक श्री. जी. एस. उर्फ दादासाहेब वैद्य हे पूर्वी सांगली एज्युकेशन सोसायटीत श्री. बेनाडीकरांबरोबर शिक्षक म्हणून त्यांचे सहकारी होते. दादासाहेबांचे धाकटे बंधू श्री. वसंतराव वैद्य हे अमेरिकेहून उच्च तांत्रिक शिक्षण घेऊन आले होते आणि स्वस्तिक रबर कारखान्याच्या विकासाची योजनाही त्यांच्यापुढे होती. साहजिकच त्यांना श्री. बेनाडीकरांसारखा अनुभवी माणूस हवा होता. त्यांच्या व्यवहारज्ञानाचा, ओळखींचा आणि विक्रयकलेचा उपयोग स्वस्तिक कारखान्याला चांगल्या प्रकारे झाला.

स्वस्तिकचे बिझिनेस मॅनेजर म्हणून त्यांनी कामास सुरुवात केली तेव्हा कारखान्याची सालिना विक्री जेमतेम १० लाखांची होती. यंदा ती आठ कोटी रुपयांवर गेली आहे. यामागे बेनाडीकरांची वीस वर्षांची सेवा किंवा औद्योगिक तपश्चर्या दिसते.

१९६२ साली त्यांचा पहिला परदेशदौरा झाला. या दौऱ्यात बैरुतमधून रबरी मोजे व मोटार मॅट्रेसेसची पहिली ऑर्डर त्यांनी मिळवली. मध्यपूर्व व आफ्रिका या भागांतील बाजारपेठेची पाहणीही त्यांनी केली. १९६५ साली सिंगापूर, बँकॉक, कौलालंपूर, कोलंबो या भागात ते जाऊन आले. १९६७ साली ते पुन्हा मध्यपूर्व व आफ्रिकेच्या दौऱ्यावर गेले होते. १९७१ साली रशिया, पूर्व-जर्मनी, लेबानन, अमेरिका, वगैरे देशांना भेटी देऊन त्यांनी स्वस्तिकच्या निर्यातीत वाढ घडवून आणली. याशिवायही प्रसंगपरत्वे ते काही वेळा परदेशी जाऊन आले आहेत.

श्री. बेनाडीकर हे डायमंड क्लॉक मॅन्युफॅक्चरिंग कंपनी व स्वस्तिक प्लास्टिक्स प्रा. लि. चे संचालक व वैद्य इंडस्ट्रिजचे भागीदार आहेत. १९६८ साली ते 'कॅपेक्सिल' या संस्थेच्या रबर पॅनेलचे उपाध्यक्ष होते.

श्री. बेनाडीकरांच्या पत्नी सौ. मालतीबाई या घरसंसाराची सर्व जबाबदारी समर्थपणे सांभाळीत असल्यामुळे (आता त्यांना सुविद्य सूनबाई सौ. अंजली यांचा बराच हातभार लागत असतो) बेनाडीकरांना आपला सर्व वेळ व सर्व लक्ष व्यवसायाकडे पुरवता आले.

श्री. बेनाडीकर आता आपल्या साठाव्या वर्षी सेवानिवृत्त होत आहेत, याच वेळी त्यांचे चिरंजीव आनंद हे आपले अमेरिकेतील व्यवसाय-शिक्षण पूर्ण करून, एक्सपोर्ट एंजिनियर म्हणून किर्लोस्कर कमिन्सकडे कामाला लागले आहेत, ही आनंदाची गोष्ट. बेनाडीकरांची दुसरी पिढीही औद्योगिक क्षेत्रात आली आहे.

श्री. बेनाडीकर हे माझे बालमित्र. शहापूर-बेळगावच्या चिंतामणराव हायस्कुलात त्यांचा पहिला परिचय झाला. पुढे किर्लोस्कर मासिकाचा सहसंपादक म्हणून मी किर्लोस्करवाडीस असताना तेथील हायस्कुलात शिक्षक म्हणून ते आले तेव्हा आमचा जुना परिचय दृढ झाला. नंतर ते किर्लोस्कर कारखान्याकडे आल्यावर तर ते माझे व्यवसायबंधू झाले. १९५४ साली ते पुण्यास आल्यावर पाच वर्षांनी किर्लोस्कर प्रेस पुण्यास आला आणि पुन: आम्ही जवळ आलो. उद्योगव्यवसायात मोठ्या पदावर राहूनही ते आमच्यासारख्या अनेक मित्रांना न विसरता त्यांच्या कौटुंबिक आनंदात भर घालतात ही खचित उल्लेखनीय गोष्ट.

—वा. कृ. गलगली

## अर्थ

विनम्र अभिवादन

# दि पूना अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणे.

२५ शुक्रवार पेठ, महात्मा फुले मार्केटसमोर, कॉर्पोरेशन कमर्शियल बिल्डिंग, पुणे २.

स्थापना : १९२४ * सुवर्ण महोत्सवी वर्ष * ध्वनी संपर्क ५५७०१

बँकिंग व्यवसायाची अर्धशतकाची यशस्वी वाटचाल आणि नव्या योजना हाती घेऊन पुढील वाटचाल. महात्मा फुले मंडईच्या मध्यवर्ती ठिकाणची एकमेव सहकारी बँक.

| मा. ह. मा. थोरात<br>सदस्य म. न. पा. पुणे.<br>कार्याध्यक्ष. | मा. सं. ल. शिरोळे<br>विशेष कार्यकारी दंडाधिकारी.<br>उपकार्याध्यक्ष | श्री. म. मो. रवडे<br>उपव्यवस्थापक |
|---|---|---|



*With Best Compliments From*

# Poona Guest House

40 Years in Service of Customers.

**Tel. : 56679**



# सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँक नियमित, सोलापूर

मुख्य कचेरी : १९/२०, रविवार पेठ, सोलापूर २

शाखा

| नाथ चौक<br>पंढरपूर | सदर बझार<br>सोलापूर | नीलानगर कस्तुरबा मार्केट<br>सोलापूर | भावनाऋषी पेठ<br>सोलापूर | सुभाष चौक<br>बार्शी |
|---|---|---|---|---|

आपल्या शाखांनिशी औद्योगिक सहकारी संस्थांचे सेवेस सदैव सिद्ध. ठेवींवरील आकर्षक दर, ड्राफ्ट बद्दलच्या सोयी. आपल्या मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्यासाठी सेफ डिपॉझिट व्हाल्टची सोय यासाठी नजीकच्या शाखेस जरूर भेटा.

| रा. आ. कुलकर्णी<br>बी. ए., एल. एल. बी.<br>मॅनेजर | जे. एच. कुलकर्णी<br>बी. ए.<br>जनरल मॅनेजर | रा. चि कुचन<br>व्हा. चेअरमन |
|---|---|---|

भारतातील सर्वप्रथम स्थापित व महाराष्ट्र राज्यातील एकमेव औद्योगिक सहकारी बँक

# "अर्था"चे अभिनंदन

(१९६०)

कोणत्याही जनसत्ताक राज्यविधानाचा मुख्य आधारस्तंभ म्हणजे चालू घडामोडीविषयी समंजसपणा व देशापुढील योजना व ध्येय यासंबंधी सबोध उत्साह. हे आधारस्तंभ बळकट करण्याची जबाबदारी विशेषतः वृत्तपत्रांवर असते. सर्वसाधारण समाजाला आर्थिक घडामोडी ह्या स्वभावतःच दुर्बोध असतात व सध्याच्या गुंतागुंतीच्या घडामोडींची अंतःप्रवणता समजणे त्याला विशेष कठीण असते, त्या समजून घेण्यात त्यांना साहाय्य देणे हे आपल्या "अर्थ" या साप्ताहिकाचे कार्य राष्ट्रहिताच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. "अर्थ" ही कामगिरी फार उत्कृष्ट रीतीने बजावीत आहे असे मी स्वानुभवावरून दृढविश्वासाने सांगू शकतो.

— चिं. द्वा. देशमुख

प्रो. काळे ह्यांनी आयुष्यभर "अर्था"ला पूर्णपणे वाहून घेतले होते. त्यांची विद्वत्ता, कर्तृत्व, अनेक क्षेत्रांतील स्नेहसंबंध ह्यांमुळे त्यांना आपली इतर महत्त्वाची व दगदगीची कामे सांभाळूनही "अर्थ" संपादनाचे काम करता आले. परंतु त्यांच्यामागे गेली पंधरा वर्षे त्यांचे चिरंजीव श्रीपादराव ऊर्फ नानासाहेब ह्यांनी ज्या निष्ठेने व सव्यसाची कर्तबगारीने अर्थ–साप्ताहिकाचे काम चालू ठेवले आहे त्याबद्दल महाराष्ट्र त्यांचा ऋणी आहे. नव्या महाराष्ट्रनिर्मितीनंतर आपणामध्ये एक नवे युग सुरू होणार आहे. त्याचा उपयोग सामान्य जनतेची, व विशेषतः बहुजन समाजाची आर्थिक स्थिती सुधारण्यास व्हावयाचा असेल तर आर्थिक माहिती व अर्थव्यवहार ह्याबद्दल सशास्त्र विवेचन ह्यांचा प्रभाव सर्व साक्षर नागरिकांपर्यंत पोहोचला पाहिजे. गेली पंचवीस वर्षे नियमितपणे आर्थिक विषयासंबंधी लोकशिक्षणाचे कार्य पार पाडल्याबद्दल संपादकांचे अभिनंदन करणे योग्य आहे.

—द. गो. कर्वे

न्यायमूर्ति रानड्यांचे शिष्य व निस्सीम अनुयायी, भारतातील सुविख्यात व कर्तबगार अर्थशास्त्रज्ञ प्राध्यापक वा. गो. काळे यांनी "अर्थ" या साप्ताहिकास सुरुवात करून २५ वर्षे पुरी होत आहेत. सुरुवातीस काही काळ खुद्द कै. वामनरावजींचे नेतृत्व अर्थास लाभले. त्यांच्या निधनानंतर, आजपावेतो, त्यांचे चिरंजीव श्री. श्री. वा. काळे यांनी अत्यंत निष्ठेने "अर्थ" चालविला आहे. केवळ अर्थविषयक प्रश्नांची चर्चा करणारे व माहिती देणारे साप्ताहिक मराठीत २५ वर्षे सातत्याने प्रसिद्ध होत राहते हीच गोष्ट कौतुकाची मानली पाहिजे; यांचे सर्व श्रेय श्री. श्रीपादरावांची निष्ठा व चिकाटी या गुणांबरोबरच त्यांचे कौशल्य व योजकता यांसहि दिले पाहिजे. मराठी वृत्तपत्रीय सृष्टीत अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बजावली आहे.

— ध. रा. गाडगीळ

महाराष्ट्रातील नियतकालिकांत राजकीय, सामाजिक अथवा ललित साहित्याला वाहिलेल्या वर्तमानपत्रांची व मासिकांची संख्याच फार मोठी आहे. त्या मानाने आर्थिक विषयाचा ऊहापोह करणारी पत्रे क्वचितच आढळतात. याचे कारण उघड आहे. अशा पत्राचे संपादन करण्यास फार अभ्यास व परिश्रम लागतात आणि प्रसाराला वाव मात्र अगदी बेताचा.

अशी वस्तुस्थिती असता गेली २५ वर्षे चुकूनही खंड पडू न देता "अर्थ" सारखे एक उत्कृष्ट साप्ताहिक आपल्या वडिलांच्या थोर परंपरेला शोभेल असे चालवून श्री. श्रीपादराव काळे यांनी महाराष्ट्राची जी सेवा केली आहे, तिचे मोल खचित फार मोठे ठरेल.

—शं. वा. किर्लोस्कर

सन १९३५ साली प्रा. वामनरावजी काळे यांनी 'अर्थ' साप्ताहिकास सुरुवात केली. ७–८ वर्षे त्यांनी आणि पुढे त्यांचे सुविद्य चिरंजीव श्री. श्रीपादराव काळे यांनी हे साप्ताहिक चालवून आज रौप्यमहोत्सवाचा भाग्याचा दिवस येत आहे. हे साप्ताहिक आर्यभूषण मुद्रणालयात मुद्रित केले जाते व त्यामुळे त्याच्या जन्मापासून आज सतत २५ वर्षे माझा जुळणीस म्हणून या पत्राशी सतत परिचय आहे. आम्हा कामगारांच्या अडीअडचणी ध्यानात घेऊन उभयता वामनरावजी व श्रीपादराव यांनी सौजन्याने व सहानुभूतीने आमच्याकडून काम करून घेतले. जाहिरातींची व मजकुरांची सजावट आम्हांस त्यांनी समजावून देऊन करून घेतली व 'अर्था'चा दर्जा कायम राखला.

"अर्थ" साप्ताहिकातील विषयांचे मला ज्ञान अवगत नसल्याने मी त्याबाबत काय सांगणार! परंतु काही अवघड प्रसंगी श्री. काळे यांचा सल्ला अचूक मिळत असे. त्यांच्या सौजन्यपूर्ण वागण्याने व अडचणींना धीराने तोंड दिल्यानेच आजचा हा सौभाग्याचा दिवस उजाडत आहे.

—म. वि. पाटील
जुळणी खात्यातर्फे

(१९७४)

आपला 'अर्थ'चा दिवाळी अंक दिवाळीचे सुटीहून परत आल्याबरोबर हाती पडला. नवा अंक चाळून पाहायच्या सवयीने संपादकीय आणि अनुक्रमणिका वाचली त्याबरोबर लक्षात आले की हा अंक म्हणजे खरोखरीचा विशेषांक आहे. कै. प्रा. वा. गो. काळे यांचे कर्तृत्व व्यक्तिशः मला कॉमर्सचा विद्यार्थी नसल्याने व मूळचा पुणेकर नसल्याने अज्ञातच होते. पण अंकाची जशी पाने उलगडू लागलो तसतसा अलिबाबाच्या गुहेत शिरल्यासारखे वाटू लागले. कै. प्रा. काळे यांचे खासगी आयुष्यातील वैशिष्ट्य त्यांच्या कन्या सौ. कोकिळ व अर्थचे मॅनेजर श्री. कुळकर्णी यांच्या लेखांतून उत्तम प्रगट झाले आहे. ते वाचून त्यांच्याबद्दलचा आदर अधिकच वाढला. तोपर्यंत

कै. प्रा. काळे हे महाराष्ट्रातील एक अग्रणी अर्थतज्ज्ञ होते एवढीच त्यांच्याविषयी माहिती होती.

'अर्थ'मधील पुनर्मुद्रित केलेले बरेचसे लेख जर सालची तारीख नसती तर आजच्या पिढीसाठीच लिहिलेले आहेत असेच वाटले असते. सहकार, बँकिंग, सुशिक्षितांची बेकारी, देशातील अर्थव्यवस्थेला संरक्षक राजनीती, यांसारखे विषय १९३५ साली प्रभावीपणे मांडणारे कै. प्रा. काळे हे खरोखरीचे द्रष्टे होते अशी खात्री झाली. ज्या काळात देशातील सुशिक्षित पुढारी मुख्यतः स्वराज्यप्राप्तीच्या मागे लागले होते किंवा समाजसुधारणांचा पाठपुरावा करीत होते त्या काळात स्वतंत्र भारताची अर्थव्यवस्था खंबीर पायावर उभी करण्याचा प्रयत्न कै. काळे मोठ्या हिरिरीने करीत होते हे मोठे कौतुकाचे वाटते. स्वातंत्र्यप्राप्ती ही त्या काळाची प्राथमिक गरज नसती तर कै. प्रा. काळे यांचे कार्य इतिहासात अधिक मानाचे ठरले असते. त्यामुळेच स्वातंत्र्याच्या २५ वर्षांनंतर जेव्हा आमच्या अर्थव्यवस्थेचा गोंधळ नजरेस येतो तेव्हा कै. प्रा. काळे यांचे लिखाण व कार्य आम्हाला आज अधिक महत्त्वाचे वाटत आहे. महाराष्ट्राच्या दुर्दैवाने इतर प्रांतांच्या तुलनेत अर्थकारणापेक्षा राजकारणाला जास्त महत्त्व दिल्याने आमच्या समाजाची आर्थिक आघाडीवर पीछेहाट झाली आहे.

यंदा बरेच दिवाळी अंक चाळले. पण सामान्यतः ते अतिशय सुमार वाटले. त्या पार्श्वभूमीवर 'अर्थ'चा दिवाळी अंक म्हणजे संपादनकौशल्याचा उत्कृष्ट नमुना वाटला. 'अर्था'तील विनोदी चुटके विशेष उल्लेखनीय वाटले. असा सुंदर अंक आपणाकडून पुन्हा मिळणार नाही याचे मात्र मनापासून वाईट वाटले.

—सु. वि. मेहेंदळे
बी. ई. (मेकॅ.), एम. बी. ए. (आय. आय.एम. ए.)

कै. प्रो. वा. गो. काळे यांनी १९३५ साली सुरू केलेले 'अर्थ' पाक्षिक १९७४ अखेर बंद होणार असल्याचे दिवाळीच्या अंकात आलेले निवेदन वाचले. श्री. श्री. वा. काळे यांनी आपले वडिलांच्या पश्चात गेली २८ वर्षे ते चांगल्या तऱ्हेने चालू ठेवले. या पाक्षिकातून 'अर्थ'शास्त्राशी निगडित असलेल्या विषयांवरचे लेख व माहिती येत असे. विशेषतः बँका व विमा कंपन्या यात काम करणाऱ्या लोकांना त्यातील माहिती फार उपयुक्त असे. १९६२ सालापासून आमच्या महाराष्ट्र बँकेत येणारा 'अर्थ' पाक्षिकाचा अंक मी नित्यनियमाने वाचत आलो आहे. पाक्षिक वैयक्तिक निंदा व स्तुती यापासून अलिप्त होते. कोणावरही बोचक टीका नसे. अशा तऱ्हेचे दर्जेदार पाक्षिक चालवण्याचे कार्य आपण एवढ्या सातत्याने केल्याबद्दल धन्यवाद.

—म. ज. राजमाचीकर, बी. कॉम्


महाराष्ट्रातील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य व अग्रेसर संस्था

## डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे २

संस्थापक : कै. प्रा. ग. कृ. भोपटकर] स्थापना : १९१८ [टेलिफोन नंबर : ५४९९०

—: महत्त्वाचे अभ्यासक्रम :—

(१) गव्हर्नमेन्ट कमर्शिअल डिप्लोमा कोर्स (जी. सी. डी.) : मुदत : १ वर्ष, किमान पात्रता : एस्. एस्. सी.
वेळा : सकाळीं, दुपारीं किंवा रात्रीं. माध्यम : मराठी व इंग्रजी विद्यार्थिनींसाठी फक्त सकाळच्या वेळेत स्वतंत्र वर्ग.

(२) प्री-डिग्री कॉमर्स एक्स्टर्नल परीक्षा : किमान पात्रता : इंग्रजी आणि गणित किंवा अंकगणित घेऊन एस्. एस्. सी.
वेळा : सकाळीं, दुपारीं किंवा रात्रीं. माध्यम : मराठी व इंग्रजी.

(३) प्री-डिग्री आर्ट्स् एक्स्टर्नल परीक्षा : किमान पात्रता : इंग्रजी घेऊन एस्. एस्. सी.
वेळा : सकाळीं, दुपारीं किंवा रात्रीं. माध्यम : मराठी व इंग्रजी.

—: इतर अभ्यासक्रम :—

बी. कॉम पार्ट वन व पार्ट टू एक्स्टर्नल परीक्षा, स्पेशल बी. कॉम्., एक्स्टर्नल परीक्षा, डी. कॉम्., कंपनी सेक्रेटरी, कॉस्टिंग, इंग्रजी-मराठी टाइपरायटिंग, इंग्रजी शॉर्टहॅण्ड, बॅन्कर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

प्रसिद्धी-पत्रक व प्रवेश अर्ज : १ रुपया ३५ पैसे

व. इ. रिसबूड
बी. ए., डी. कॉम्.
उपप्राचार्य


अ. ग. भोपटकर
एम्. कॉम्., एल्एल्. बी.
प्राचार्य

'किर्लोस्कर पंप' हेच ना ? हे पाणी खूप दूरचा प्रवास करीत आलं आहे. मोठ्या नळातून मैलांचे अंतर तोडीत... पण त्याला खेचीत आणलं कोणी ? अर्थातच 'किर्लोस्कर पंपांनी' आणि आता ते आपल्या हाताजवळ नळात आहे.

पाणी पुरवठा... 'किर्लोस्कर पंपांचं' हे अत्यंत महत्त्वाचं काम. अनेक लहान मोठ्या शहरात, रात्रंदिवस, 'किर्लोस्कर पंप' हे काम करीत आहेत.

दुसरीहि अनेक कामं 'किर्लोस्कर पंप' करतात. शेतीसाठी आणि औद्योगिक उपयोगासाठी पाणी पुरवठा करणं, तसेच सांडपाणी खेचणं ही कामंसुद्धा ते करीत असतात.

'किर्लोस्कर पंप' अनेक प्रकारचे आहेत... छोट्या मोनोब्लॉकपासून मोठ्या व्हर्टिकल टर्बाइन पंपांपर्यंतचे विविध प्रकार... छोट्या अगर मोठ्या, शहरी अगर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी, गरजेनुसार यथायोग्य पंप. शिवाय, सुटे भाग सहज मिळतात. शिवाय विक्रीपूर्व आणि विक्रीनंतरची देखभाल सेवाहि सर्वत्र मिळू शकते.



किर्लोस्कर

किर्लोस्कर पंप, सर्वोत्तम पंप

किर्लोस्कर ब्रदर्स लि.

उद्योग भवन, टिळक रोड, पुणे–४११ ००२

कार्यालये : अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, कलकत्ता, नवी दिल्ली, इंदूर, जयपूर, मद्रास, सिकंदराबाद.

● Registered users : Kirloskar Brothers Ltd




PRATIBHA-722B MAR

# माझा अनुभव

माझे वडील अकाली गेल्यामुळे मला एफ.वाय.बी.ए.पर्यंत झालेले शिक्षण सोडून द्यावे लागले आणि कुटुंबाची जबाबदारी घ्यावी लागली. नोकरीच्या मागे धावण्यात काही अर्थ वाटेना. तेव्हा धंदा म्हणून कोंबडीची पिले पाळण्याचा विचार केला. माझी योजना उद्योग खात्याने मंजूर केली. बँकेने कर्ज दिले. आता या धंद्यापासून मला रोज तीस ते चाळीस रुपयांची कमाई होत आहे.

— पृथ्वीराज गणेशराज परदेशी, पुणे
मु. [illegible], जिल्हा पुणे



माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन सचिवालय, मुंबई


Shree inject new blood in pharmaceutical industry...
Shree's quality Injection Bottle Caps, Blood Transfusion Stoppers, Surgical Gloves etc., are manufactured in collaboration with West & Company Incorporated U.S.A., and are in conformity with the internationally accepted standards and specifications.
The Blood Transfusion Stoppers are made of high Duro hardness, with special lacquer coating which eliminate all leaching possibilities. Shree's rubber products prevent contamination and retain highest purity.
SHREE PRODUCTS LIMITED, POONA-16.
BLOOD TRANSFUSION BOTTLE STOPPERS
Non-splinter, airtight, rigid testing at each stage.
A Subsidiary of
SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
Kirkee, POONA (INDIA).


दोघे थकला एकजण ढकला। एल केए पंपसेट सहज चालवा
Kirloskar
जेथे असेल पाणी। एल केए पंपसेट राबतो गुलामावाणी
• वजनाने हलका
• बेताचा आकार, सर्वोत्कृष्ट कामगिरी, ३″ × ३″ चा पंप चालू शकतो
• केव्हाही, कोठेही अन् कोणत्याही हवामानात झटपट व सहज चालू शकतो
• दर ताशी ७२,००० लिटर पाणी खेचतो
अधिक माहितीसाठी आपल्या नजिकच्या किर्लोस्कर विक्रेत्याशी संपर्क साधा
किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड
१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर पथ, पुणे ४११००३




'हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर, घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. वार्षिक वर्गणी रु. ६